# वार्षिक उद्योग पहाणी क्षेत्रकामासंदर्भात येणाऱ्या अडचणी (FAQ)

प्रश्न क्र.१ एखादया कंपनीच्या वेगवेगळ्या ठिकाणी शाखा असतील परंतु सर्व शाखांचे मिळून एकच Balance Sheet तयार होत असेल व क्षेत्रकाम करण्यासाठी निवडण्यात आलेल्या युनिट साठी वेगळी Balance Sheet किवा Trial Balance नसेल तर अश्यावेळी काय करावे ?

उत्तर : जर एखादया कारखान्याची एका पेक्षा जास्त manufacturing units आहेत व या कारखान्याची Joint B/S असल्यास आपल्याला ASI Survey साठी निवड झालेल्या unit ची माहिती भरणे आवश्यक आहे यासाठी संबंधित units ची trial balance कारखान्याकडून घेण्यात यावी, किंवा या unit ची separate माहिती उदा . profit & loss a/c , balance sheet, fixed assets व पत्रक भरण्यासंबंधात आवश्यक असणारी इतर माहिती घेण्यात यावी, किंवा एकूण युनिट्सच्या Sales Value पैकी आपणासाठी निवड झालेल्या युनिटच्या Sales Value च्या टक्केवारीनुसार B/S व P&L मध्ये विभागणी करून ASI Return भरावे.

प्रश्न क्र.२ Balance Sheet कोणत्या Act प्रमाणे असावी ?

उत्तर : Pvt Ltd कारखान्यांकरिता ASI Return भरताना Companies Act, १९५६ नुसार तयार करण्यात आलेली Balance Sheet घेणे आवश्यक आहे, व एखादा कारखाना proprietorship किंवा partnership असल्यास व कारखानदाराने Income Tax Act नुसार Balance Sheet तयार केलेली असल्यास त्यानुसार ASI Return भरण्यात यावे.

प्रश्न क्र.३ एकच उद्योग सलग २ किंवा त्यापेक्षा जास्त वर्षासाठी वारंवार निवडला जातो त्यावेळी माहिती संकलन करताना उद्योग मालकाचा नकारात्मक प्रतिसाद मिळतो व माहिती संकलन करताना तसेच पत्रक भरताना अडचण निर्माण होते .

उत्तर : सदर उद्योगाची निवड ही Random पद्धतीने केलेली असल्यामुळे निवड करण्यात आलेल्या उद्योगाची माहिती भरणे उद्योजकास बंधनकारक आहे, जर त्या उद्योजकाने माहिती देण्यास नकार दिला अथवा टाळाटाळ केल्यास सांख्यिकी संग्रहण अधिनियम, २००८ नुसार त्यावर कारवाई होऊ शकते याबाबत उद्योजकाच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे.

प्रश्न क्र.४ Project Base असलेल्या कंपन्यांच्या दोन वर्षाची Balance Sheet प्राप्त करून घेताना अडचण निर्माण होते , तसेच अशा उद्योगांचे मुख्य कार्यालय जिल्ह्याच्या बाहेर असल्यामुळे पत्रक भरताना अडचण निर्माण होते . उदा. Shri Sathe Infracon pvt. Ltd .

उत्तर : Project Base असलेल्या कंपन्या उदा. Shri Sathe Infracon pvt. Ltd. या infrastructure कंपन्यांचा मुख्य उद्देश पायाभूत सुविधा पुरविणे हा आहे . मुख्यतः Constructions हा भाग Service Sector मध्ये अंतर्भूत होतो, तथापि Construction साठी लागणारे Ready Mix Concrete सदर उद्योगास manufacture करावे लागते म्हणून सदर उद्योगातील Manufacture Of Ready Mix Concrete activity ही manufacturing activity मध्ये समाविष्ट केली जाते . सदर उद्योग बहुतांशी वेळा एका वर्षा पेक्षा जास्त कालावधीचा असल्यामुळे किंवा joint balance sheet असल्यामुळे , या कंपनीचा raw material expenses , labour & other staff salary & wages expenses , आणि other administrative expenses व इतर expenses चे bifurcation ची माहिती घेऊन पत्रक भरण्यात यावे, व सदर उद्योगाबाबत उत्पन्नाच्या ( income ) Term & Condition चा विचार करून त्या वर्षातील उत्पन्न ( income) Ready mix Concrete Sales ( Block J १२ ) मध्ये नमूद करण्यात यावे . संबंधित units ची trial balance कारखान्याकडून घेण्यात यावी . किंवा या unit ची separate माहिती उदा . profit & loss a /c , balance sheet, fixed assets व पत्रक भरण्या संबंधात येणारी इतर माहिती घेण्यात यावी. किंवा एकूण युनिट्सच्या Income पैकी निवड झालेल्या unit च्या Income च्या टक्केवारीनुसार Balancesheet व Profit & Loss मध्ये विभागणी करून ASI Return भरावे.

प्रश्न क्र.५ उद्योगांचा detail address नसल्यामुळे कंपनी Trace करण्यास अडचण निर्माण होते .

उत्तर : मुख्य कार्यालयाकडून प्रादेशिक कार्यालयास प्राप्त झालेल्या कारखान्यांच्या यादीतील कारखान्यांचे address, contact number google मध्ये search करून confirm करणे आवश्यक आहे . कर्मचाऱ्यानी प्रत्यक्ष कारखान्याला भेट देण्यापूर्वी जर त्या कारखान्याचा contact number उपलब्ध असल्यास या कारखान्यास दूरध्वनिद्वारे संपर्क साधून सदर कारखान्याच्या अस्तित्वाबाबत त्याचप्रमाणे production activity, तसेच पत्रक भरण्यासाठी आवश्यक असलेल्या documents बद्दल माहिती कारखान्याला देणे आवश्यक आहे . जर सदर कारखान्यांचा address google वर अथवा प्रत्यक्ष field वर जाऊन सुद्धा trace होत नसल्यास Not Trace ( Status Code ५ ) देण्यात यावा .

प्रश्न क्र.६ एकच उद्योग दोन वेगवेगळ्या DSL नंबरनी निवडला जात असल्यामुळे माहिती संकलन करताना तसेच पत्रक भरताना अडचण निर्माण होते.

उत्तर : ASI Return भरण्यासाठी निवड झालेल्या कारखान्याचे एकाच ठिकाणी Manufacture Unit आहे परंतु माहिती संकलन करण्यासाठी निवडण्यात आलेला एकच उद्योग दोन वेगवेगळ्या DSL क्रमांकानी निवडला जात असल्यास त्या पैकी HIGHEST DSL क्रमांकाच्या कारखान्याचे ASI Return भरावे व Lowest DSL चा कारखाना रद्द समजणे व त्यासाठी पत्रकात (Status code ४) असा शेरा देण्यात यावा . ASI Return भरण्यासाठी निवड झालेल्या कारखान्याचे एका पेक्षा जास्त ठिकाणी Manufacture Unit आहे, व वेगवेगळ्या पत्ता (address ) व वेगवेगळ्या DSL क्रमांकावर निवड झाली असल्यास या कारखान्याच्या निवड झालेल्या प्रत्येक UNIT चे वेगवेगळे ASI Return भरणे आवश्यक आहे. सदर निवड झालेल्या कारखान्याचे Joint Balance Sheet असल्यास ASI Return भरताना निवड झालेल्या प्रत्येक युनिटची माहिती ही या कारखान्याचे Joint Balance Sheet यूनिट प्रमाणे bifurcate करून निवड झालेल्या पत्त्यावर असलेल्या Unit चे पत्रक भरणे आवश्यक आहे.

प्रश्न क्र.७ कारखान्याचे एक कार्यालय असल्यास व वस्तुनिर्माण (Manufacturing) यूनिट दोन असल्यास पत्रक कोणाकडून भरुन घ्यावे ?

उत्तर : सदर कारखान्याच्या Joint Balance Sheet चे bifurcation account section मधील कर्मचाऱ्यांकडून करून प्रत्येक यूनिट ची separate माहिती घेणे आवश्यक आहे .

प्रश्न क्र.८ बंद झालेल्या कारखान्यास भेट दिली असता कारखान्याच्या आजूबाजूच्या परिसरात कारखान्यासंबंधित तसेच इतर कोणतेही कर्मचारी नसतील व कारखाना बंद दिसत असेल अशा वेळी काय करावे ?

उत्तर : एखादा कारखाना मागील ३ किंवा त्या पेक्षा जास्त वर्षी सतत बंद असल्यास नियमानुसार त्याला (status code ४ ) देणे आवश्यक आहे. या संदर्भात योग्य ती शहानिशा करून त्या नुसार योग्य तो Status Code द्यावा.

प्रश्न क्र.९ उद्योग भेटी दरम्यान जी व्यक्ती उपस्थित असते त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार Status Code नोंदविला जातो व तशी माहिती MPR पाठवताना दिली जाते ,तथापि प्रत्यक्ष माहिती घेते वेळी मिळालेल्या माहिती नुसार Status Code बदलला जातो .

उत्तर : प्रत्यक्ष माहिती घेते वेळी जर तो उद्योग चालू असल्यास त्याचे पत्रक भरण्यात यावे व मागील MPR च्या स्टेटस कोड चा संदर्भ देऊन स्टेटस कोड मध्ये योग्य तो बदल करून त्याची नोंद नवीन MPR मध्ये करून तो MPR मुख्यालयास पाठविण्यात यावा.

प्रश्न क्र.१० CIN Number काय व तो कोणत्या कंपनी साठी असतो ?

उत्तर : CIN Number म्हणजे Corporate Identification Number ( CIN ). ज्या कंपन्या Registrar of companies act १९५६ अंतर्गत नोंदणीकृत झालेल्या असतात व ज्या कंपन्याचा Organisation Code 4 ते 7 ( BLOCK B , ITEM 2 ) मध्ये आहे , त्यांनी ( BLOCK B , ITEM 3) मध्ये 21 Digits Alpha Numeric Code नोंदविणे आवश्यक आहे .

प्रश्न क्र.११ काही कंपन्या मार्फत संगणकावर 40% घसारा दर्शविला जातो तथापि पत्रक भरताना ब्लॉक C मध्ये Error येतो

उत्तर : Depreciation as per balance sheet असा Remark (block N) मध्ये लिहावा/नमुद करावा .

प्रश्न क्र.१२ पत्रक भरताना Capital Work In Progress ची Entry कुठे करावी ?

उत्तर : पत्रक भरताना Capital Work In Progress ची नोंद Fixed Assets ( Block C ,Sr. No 9, col. 3 to 13) मध्ये करण्यात यावी .

प्रश्न क्र.१३ कंपनी मालकाची किंवा भागीदाराची वैयक्तिक वापरासाठी असलेली इमारत किंव्हा इतर स्थावर मालमत्ता यांची Entry पत्रक भरताना घ्यावी का , आणि घ्यायची असेल तर कोणत्या BLOCK मध्ये घ्यावी ?

उत्तर : ज्या कारखान्याची स्थावर मालमत्ता कारखान्याच्या मालकीची आहे त्या स्थावर मालमत्तेची नोंद ( BLOCK C , FIXED ASSETS ) घेणे आवश्यक आहे , व ज्या कारखान्याची स्थावर मालमत्ता कारखानदारांच्या स्वतःच्या मालकीची असल्यास त्या स्थावर मालमत्तेची नोंद ASI Return मधून वगळण्यात यावी.

प्रश्न क्र.१४ Fixed Asset चा Block भरताना Gross Block व Net Block आहेत दोन्ही मध्ये काय फरक आहे ? Gross Block व Net Block कधी भरावा ?

उत्तर : Companies Act 1956 नुसार नोंदणी झालेल्या Pvt Ltd कारखान्यांना fixed asset चे schedule Gross Block मध्ये तयार करणे बंधनकारक आहे. व याची नोंद ASI Return भरताना ( BLOCK C , COL. 3 ते 13 ) मध्ये घेणे आवश्यक आहे . Income Tax Act नुसार ज्या कारखान्याचे Fixed Assets Schedule Net Block मध्ये तयार केलेले असते अश्या Proprietorship अथवा Partnership कंपन्यांचे ASI Return भरताना fixed assets ची value ( BLOCK C , COL. 4,5,6,9,10,12,13 ) मध्ये नोंदविणे आवश्यक आहे.

प्रश्न क्र.१५ वाउपा पत्रक भरताना Block C मध्ये Depreciation दिलेले असते त्यातील प्रत्येक बाबींचे Depraciation रेट ठरलेला आहे मात्र काही कारखान्यांच्या Balance Sheet मध्ये त्यापेक्षा जास्त प्रमाणात ते मूल्य दाखविलेले असते त्यामुळे वारंवार ERROR येतात अश्या वेळी काय करता येईल ?

उत्तर : त्यासंबधीचा Depreciation as per balance sheet असा Remark (block N) मध्ये लिहावा.

प्रश्न क्र.१६ बऱ्याच उद्योगांच्या Balance Sheet मध्ये फक्त Building ची रक्कम दिलेली असते land ची किंमत विचारली असता ती Building च्या किंमती मध्ये समाविष्ट केलेली असल्याचे कळविले जाते परंतु Bifurcation दिले जात नाही , ती किंमत कशी नोंदवावी ?

उत्तर : बहुताशी कारखान्याच्या Balance sheet मध्ये Land ची किंमत building मध्ये समाविष्ट केलेली असते. त्यामुळे आपल्याला कारखानदारास ती किंमत वेगळी करून देण्यासंदर्भात सांगण्याची आवश्यकता नाही यामध्ये ती किंमत Gross Block असल्यास BLOCK C, SR. NO. 2, COL. NO. 3 TO 13 व Net Block असल्यास BLOCK C , SR. NO. 2, COL.NO. 4,5,6,9,10,12,13 या मध्ये नोंद करण्यात यावी .

प्रश्न क्र.१७ Stone Crusher उद्योगांमध्ये Agriculture Land ( खदान ) ची किंमत Land मधेच नोंदवायची का?

उत्तर : एखादया उद्योजकाची स्वत:च्या मालकीची खदान (Non - Agriculture Land ) आहे व मालक स्वत: Stone Crusher चा उद्योग करत असल्यास त्या जमिनीची ( खदान ) ची नोंद fixed assets Block C, item १, Col. २ ते १३ मध्ये करण्यात यावी . व जर ही जमीन ( खदान) शासनाच्या मालकीची असल्यास सदर उद्योजक शासनास Royalty देत असतो म्हणून या royalty ची नोंद BLOCK F, ITEM 9, COL. 3 मध्ये घेण्यात यावी.

प्रश्न क्र.१८ ASI Software मध्ये item description मध्ये बदल केला तर item मिळत नाही किंवा मिळाले तर units वेगळे असतात अशावेळी काय करायचे ?

उत्तर : सदर कारखान्यातील कर्मचाऱ्यांनी दिलेली raw material व product ची नावे किंवा NPC -MS Code जर आपल्या ASI Software नुसार जुळत नसल्यास सदर कारखान्यातील production शी संबंधित तज्ञ कर्मचाऱ्यांचे सहकार्य घेऊन आपल्या ASI Software च्या ( Block H , I व J ) मधील item ची नावे त्या कर्मचाऱ्याला दाखवावी व त्या कर्मचाऱ्याने कारखान्याने दिलेल्या Raw Material किंवा Product च्या नावा ऐवजी पर्यायी नावे शोधून आपले ASI Return पूर्ण करावे व जर Raw Material किंवा Product चे Unit वेगळे असतील तर Production शी संबंधित तज्ञ कर्मचाऱ्यांशी चर्चा करून raw material व product चे unit conversion करण्यात यावे.

प्रश्न क्र.१९ माहिती प्राप्त झाल्यानंतर सॉफ्टवेअर मध्ये block C मध्ये ( depreciation up to end ) Col. ११ मध्ये Value येत नाही, याबाबत मार्गदर्शन करावे.

उत्तर : कारखानदार Balance Sheet १) Companies Act.१९५६ २) Income Tax Act . प्रमाणे तयार करतात .

**Companies Act१९५६** नुसार तयार केलेल्या Balance Sheet ( Fixed Assets ) च्या Gross Block मध्ये ASI Software च्या ( Block C , Col . ३,४,५,६,८,९,१०) मध्ये नोंद केली असता त्याचा परिणाम ASI Software ( Final Report) च्या ( Fixed Asset , Block C , Col. ३ ते १३ ) मध्ये होतो .

प्रश्न क्र.२० Balance Sheet मधील Secured Loan व Unsecured Loan कोणत्या Block मध्ये भरावी ?

उत्तर : कोणत्याही प्रकारचे कर्ज एका वर्षा पेक्षा जास्त कालावधीचे असल्यास या कर्जाची नोंद BLOCK D, ITEM 17, COL. 3&4 मध्ये करणे आवश्यक आहे . जर त्या कारखान्याने मोठया प्रमाणात बँकांकडून एका वर्षाच्या जास्त कालावधी करीता कर्ज घेतले असेल तर ते Secured Loan म्हणून संबोधले जाते तसेच जर सदर कारखान्यात स्वत: डायरेक्टर किंवा भागीदाराने स्वत:ची रक्कम कर्ज स्वरुपात गुंतवणूक केली असेल तसेच मित्र परिवाराकडून काही रक्कम घेतली असेल तर ते Unsecured Loan म्हणून संबोधले जाते. तसेच कोणत्याही प्रकारचे कर्ज एक वर्षा पेक्षा कमी कालावधीचे असल्यास Short Term Loan Block D , Item 13Col. 3&4 मध्ये नोंद करावी .

प्रश्न क्र.२१ ASI Software मध्ये Net Profit च्या calculation करिता Semi Finished Good, Finished Goods याचा उपयोग कसा होतो ?

उत्तर : कारखान्याच्या Balance Sheet आणि Profit & Loss Account मध्ये opening stock of inventory व closing stock of inventory यांची नोंद करण्यात येते, यामध्ये raw material ,packaging material , fuel & store semi finished goods, finished goods यांचे एकत्रित value दिलेली असते सदर कारखान्यातील account section मधील कर्मचाऱ्यांकडून inventory च्या value चे bifurcation घेऊन त्या मधील semi finished goods ची नोंद ( Block D , Item 5, Col . 3 & 4 ) यामध्ये तसेच finished goods ची नोंद ASI Software Block D, Item 6, Col. 3 & 4 यामध्ये केली असता त्याचे परिणाम semi finished goods Block G , Item 7, Col 3 तसेच finished goods ( Tally sheet , Receipt Side, Sr. No. 3) मध्ये value ( + ) किंव्हा ( - ) या स्वरुपात येते.

प्रश्न क्र.२२ Balance Sheet मधील opening stock आणि closing stock कसे नमूद करावे ?

उत्तर : Balance Sheet मधील opening stock आणि closing stock ASI Return ( BLOCK D, SR . 1 TO 7, COL. NO. 3 & 4 ) मध्ये नमूद करावे . कारखानदारांकडून stock of inventory मध्ये अंतर्भूत असलेल्या raw material (indigenous / imported), packaging material, fuel & lubricant, store & consumable semi finished goods , finished goods यांची detail माहिती घेणे आवश्यक आहे . खालील प्रमाणे या Item ची नोंद ASI Return करण्यात यावी .

Op . Stock Of Raw Material (Indigenous ) ( BLOCK D , ITEM 1, COL. 3 )

Cl. Stock Of Raw Material (Indigenous ) ( BLOCK D , ITEM 1, COL. 4 )

Op . Stock Of Raw Material (imported) ( BLOCK D , ITEM 1, COL. 3 )

Cl. Stock Of Raw Material (imported) ( BLOCK D , ITEM 1, COL.4 )

Op . Stock Of Packaging Material ( BLOCK D , ITEM 1, COL. 3 )

Cl. Stock Of Packaging Material ( BLOCK D , ITEM 1, COL. 4 )

Op . Stock Of Fuel & Lubricant Material ( BLOCK D , ITEM २, COL. 3 )

Cl. Stock Of Fuel & Lubricant Material ( BLOCK D , ITEM २, COL. 4 )

Op . Stock Of Store & Consumable Material ( BLOCK D , ITEM ३ , COL. 3 )

Cl. Stock Of Store & Consumable Material ( BLOCK D , ITEM ३, COL. 4 )

Op . Stock Of Semi Finished Goods ( BLOCK D , ITEM ५ , COL. 3 )

Cl. Stock Of Semi Finished Goods ( BLOCK D , ITEM ५ , COL. 4 )

Op Stock Of Finished Goods ( BLOCK D , ITEM ६, COL. 3 )

Cl. Stock Of Finished Goods ( BLOCK D , ITEM ६, COL. 4 )

प्रश्न क्र.२३ ASI Software मध्ये balance sheet मधील नोंदी घेताना professional tax drop box मध्ये दिसत नाही.

उत्तर : Software मध्ये balance sheet मधील professional tax ची नोंद tax payable ( liability ) व tax receivable ( assets ) म्हणून करावी .

प्रश्न क्र.२४ Working days of workers, Number of mandays worked व Non manufacturing days कसे काढावेत किंवा सदरची माहिती कोणत्या Format मध्ये मागवावी ?

उत्तर : A. एका वर्षात एकूण 365 दिवसांपैकी एकूण किती दिवस प्रत्यक्ष कारखाना चालू होता त्याची नोंद Number of factory working days ( Block E 13) मध्ये घेण्यात यावी .

B. Man days work : कारखान्यातील कर्मचाऱ्यांची काम करण्यासाठी असलेली उपस्थिती याचे दोन प्रकार आहेत 1. Manufacturing days 2. Non manufacturing days .

**1.manufacturing days** : सदर कारखान्यातील कर्मचाऱ्यांची काम करण्यासाठी असलेली उपस्थिती व त्या दिवसामध्ये कमीत कमी एक तास जरी वस्तू उत्पादनासाठी Plant & Machinery चालू असेल तर त्या दिवसाची नोंद Manufacturing days म्हणून करावी .

**2. Non manufacturing days** : सदर कारखान्यामध्ये कर्मचारी काम करण्यासाठी उपस्थित आहेत , तथापि Raw material available नाही , electricity नाही , repair plant & machinery , building construction work in progress या कारणास्तव त्या दिवशी एक तास सुद्धा उत्पादनाकरिता plant & machinery चालू करण्यात आली नाही तर त्या दिवसाची नोंद Non Manufacturing days म्हणून करावी .

प्रश्न क्र.२५ Balance Sheet किंवा Profit & Loss Account मध्ये Bonus ची रक्कम दिलेली नसल्यास कशी काढावी ?

उत्तर : बहुतांशी ठिकाणी कारखान्याच्या Profit & Loss Accounts च्या salary Account मध्ये Bonus , Other Funds , Staff Welfare Fund ची Value चा समावेश असतो, अशा वेळी Account Department च्या कर्मचाऱ्यांकडून Salary Account चे Bifurcation घेऊन त्यातील Bonus ची नोंद ( Block E , Item 10 ) मध्ये करावी .

प्रश्न क्र.२६ Provident Fund ( पी . एफ .) चे डिटेल्स उपलब्ध नसतात अश्या वेळी काय करावे ?

उत्तर : कारखान्यातील accounts शी संबंधित कर्मचाऱ्यांकडून पी. एफ. च्या रक्कमेचा तपशील घेण्याचा प्रयत्न करून पी . एफ ची रक्कमेची ( BLOCK E 11) व उर्वरित पी एफ ची रक्कम Administrative Expenses ( BLOCK F , SR . 3.) Operative Expenses मध्ये नोंद करावी .

प्रश्न क्र.२७ Carriage Inward , loading and Unloading charges block J ला जातात परंतू सदर रकमेने Net Profit कमी झालेला दिसून येत नाही

उत्तर : Carriage Inward ( F3, F12 ) आणि Carriage Outward ( F13, J 12 ) यांच्या दोन वेळा नोंद करण्यात यावी . Carriage Outward ( J 12 ) Loading Unloading Charges (J 12) मध्ये नोंद झालेली Value या Net Profit वर परिणाम करतात .Block (J 12) Other Distributive Expenses मध्ये नोंद करण्यात यावी .

प्रश्न क्र.२८ कंपन्यांचे वेगवेगळे प्रकार असतात जसे की काही कंपन्या वस्तूंचे उत्पादन करतात , काही कंपन्या वस्तूंचे Trading करतात , काही कंपन्या Job Work करतात, तर कोणत्या प्रकारच्या कंपन्यांना कोणत्या Block ची माहिती भरणे आवश्यक आहे.

उत्तर : जे कारखाने वस्तूंचे Production , Trading व Job Work करत असतील तर त्या कारखान्यांची माहिती ASI Software मध्ये खालील प्रमाणे भरण्यात यावी . कारखान्याच्या मालकाने दिलेल्या balance sheet मध्ये balance sheet च्या assets मध्ये stock of inventory ची value दिलेली असते, या value मध्ये raw material, packaging material , trading material, lubricant oil, store and spares , semi finished goods , finished goods या item च्या value दिलेली असते. तसेच profit & loss account मधील material purchase, या value मध्ये raw material, packaging material , trading material, lubricant oil , store and spares या item च्या value समाविष्ट असतात. तसेच sales च्या value मध्ये production sales, scrap sales, job work income, trading sales च्या value समाविष्ट असतात. या items चे bifurcation balance sheet मध्ये नसल्यास कारखान्यातील account संबंधित कर्मचाऱ्यांकडून या items चे bifurcation घेणे आवश्यक आहे कारण या bifurcation चा उपयोग raw material consumption ( indigenous) (block H , item १ ते ११), raw material consumption ( import ) ( block I , item १ ते ६), packaging material consumption (block H , Sr. no. १४ , Col. ६), trading material consumption (block F , Sr. no. ११ , Col. ३), petrol , lubricant oil consumption ( block H , Sr. no. १७ , Col. ६ ), spare and store consumption (block H , Sr. no. २१ , Col. ६), semi finished goods ( block G , Sr. no. ७ , Col. ३ ), finished goods (Net block tally, Receipt , col . ३, (+) व (-) ) स्वरुपात असते. Production Sales Value ( Block J 12), Job Work Income Value (Block (G 1) व Trading Sales Value ( G 11) . इत्यादी block भरण्यासाठी होतो .

## Material Consumption काढण्याचे सूत्रं

### A . Raw Material Consumption (Indigenous ) ( BLOCK H 1 to 11, COL 6)

Op . Stock Of . Raw Material (Indigenous ) ( BLOCK D , ITEM 1, COL. 3 )

+ Purchases Of . Raw Material (Indigenous ) ( PROFIT & LOSS A/C )

- Cl. Stock Of . Raw Material (Indigenous ) ( BLOCK D , ITEM 1, COL. 4 )

= Raw Material Consumption (Indigenous ) (BLOCK H 1 to 11, COL 6)

(सदरची Total .Raw Material Consumption value ही ब्लॉक- H मध्ये Sr.No. १ to ११, मध्ये नोंदवावी.)

**B. Packaging Material Consumption (Indigenous ) ( BLOCK H 14, COL 14)**

Op . Stock Of . Packaging Material (Indigenous ) ( BLOCK D , ITEM 1, COL. 3 )

+ Purchases Of . Packaging Material (Indigenous ) ( PROFIT & LOSS A/C )

- Cl. Stock Of . Packaging Material (Indigenous ) ( BLOCK D , ITEM 1, COL. 4 )

= Packaging Material Consumption (Indigenous ) ( BLOCK H 14, COL 6 ))

(सदरची Total . Packaging Material Consumption value ही ब्लॉक- H मध्ये Sr.No. 14, col. 6 मध्ये नोंदवावी.)

**C. Fules & Lubricant Oil Material Consumption (Indigenous) (BLOCK H 17, COL 6 )**

Op . Stock Of Fules & Lubricant Oil Material (Indigenous) (BLOCK D , ITEM 2 , COL. 3)

+ Purchases Of Fules & Lubricant Oil Material (Indigenous ) ( PROFIT & LOSS A/C )

- Cl. Stock Of Fules & Lubricant Oil Material (Indigenous ) ( BLOCK D , ITEM 2 , COL.4)

= Fules & Lubricant Oil Material Consumption (Indigenous ) ( BLOCK H 17, COL 6)

(सदरची Total . Fules & Lubricant Oil Material Consumption value ही ब्लॉक- H मध्ये Sr.No,17, col. 6 मध्ये नोंदवावी.)

**D. Stores & spares and others Material Consumption (Indigenous ) (BLOCK H 21, COL 6 )**

Op . Stock Of . Stores & spares and others Material (Indigenous ) ( BLOCK D , ITEM3 , COL. 3 )

+ Purchases Of Stores & spares and others Material (Indigenous ) (PROFIT & LOSS A/C ) - Cl. Stock Of Stores & spares and others Material (Indigenous ) ( BLOCK D , ITEM 3 , COL. 4 )

= Stores & spares and others Material Consumption (Indigenous)( BLOCK H 21, COL. 6 )

(सदरची Total Stores & spares and others Material Consumption value ही ब्लॉक- H मध्ये Sr.No. 21, col 6 मध्ये नोंदवावी.)

**E. Raw Material Consumption (imported ) ( BLOCK I , 7 )**

Op . Stock Of Raw Material ((imported) ( BLOCK D , ITEM 1, COL. 3 )

+ Purchases Of Raw Material ((imported ) ( PROFIT & LOSS A/C )

- Cl. Stock Of Raw Material ((imported ) ( BLOCK D , ITEM 1, COL.4 )

= Raw Material Consumption ((imported ) ( BLOCK I , ७ , COL 6)

(सदरची Total Material Consumption ( import) value ही ब्लॉक- I मध्ये Sr.No. 1 to 6,col. 6 मध्ये घ्यावी.)

**(b)** जे कारखाने Trading Sales करीत असल्यास सदर कारखान्याची Trading Sales ची Value ( G 11) मध्ये नोंदविण्यात यावी व सदर कारखान्यांनी विकत आणलेली वस्तूंच्या Value ची नोंद Trading purchase (Block F 11) मध्ये करण्यात यावी .

OP. STOCK OF TRADING MATERIAL ( BLOCK D , ITEM 1, COL. 3 )

\+ PURCHASES OF TRADING MATERIAL ( PROFIT & LOSS A/C )

\- CL.STOCK OF TRADING MATERIAL ( BLOCK D , ITEM 1, COL. 3 )

= TRADING MATERIAL CONSUMPTION VALUE ( BLOCK F , ITEM 11 , COL. 3 )

सदरची रक्कम ही (Block F च्या Item No.११) मध्ये नोंद करावी. तसेच Trading Sales ची Value (Block G 11) मध्ये घेतल्यानंतर त्या दोघां मधील variation (difference) Automatically ( Block G Item ५, Col. ३) मध्ये दिसून येईल.

**(C)** Job Work करणारे कारखाने :- ज्या कारखान्याला इतर उद्योजक (Party) Raw Material देते व सदर कारखाना या उद्योजकला वस्तूंचे उत्पादन करून देतो व उद्योजक सदर कारखानदाराला त्या केलेल्या कामाचा मोबदला ( रक्कम ) देतो . अश्या प्रकारे वस्तु उत्पादन करणाऱ्या कारखान्याला Job Work करणारे कारखाने म्हणतात. या रकमेची नोंद (Block G, item १, Col . ३ ) मध्ये करण्यात यावी . एखादया गारमेंटच्या वस्तु उत्पादन करणाऱ्या कारखान्याला इतर उद्योजक (Party) कापड पुरवते परंतु सदर कारखानदार धागा , बटण व इतर Raw Material वापरतो या वापरण्यात येणाऱ्या Raw Material (Indigenous ) ची नोंद (Block H १ ते ११, item ६) व Raw Material (Imported) असल्यास त्याची नोंद ( Block I Sr. १ ते ६ item ६ ) मध्ये करण्यात यावी.

**Note : वस्तु उत्पादन करणारा कारखाना हा उत्पादना बरोबर Trading व Job work activity करू शकतो अशावेळेस वरील सूत्रानुसार येणाऱ्या block मध्ये माहिती भरणे आवश्यक आहे.**

प्रश्न क्र.२९ काही कारखान्यांच्या कामाच्या वर्गीकरणानुसार त्यांच्याशी NIC CODE जुळत नाही ,अश्या वेळी कोणता NIC CODE निवडावा ?

उत्तर : एखादा कारखाना ज्या वस्तूंचे उत्पादन करीत आहे त्यानुसार त्या कारखान्याचा NIC 5 digits code ( Block A, Item 5 ) नोंदवण्यात यावा. व त्यानुसार त्याचे raw material consumption (Indigenous ) ( Block H, Sr . 1 TO 12 ) व Raw Material Consumption ((imported ) ( Block I , ७ ) मध्ये व sale मध्ये दर्शविलेल्या Product ( BLOCK J , SR. NO. 1 TO 1२ ) मध्ये साम्य असणे आवश्यक आहे . सदर बदल झालेला NIC Code frame updation मध्ये देण्यात यावेत.

प्रश्न क्र.३० Raw Material ची नावे किंवा Product Code भरताना त्यांचे NPC MS Code निवडताना अडचण येते .

उत्तर : सदर कारखान्यातील कर्मचाऱ्यांनी दिलेली raw material व product ची नावे किंव्हा NPC MS Code जर आपल्या ASI Software नुसार जुळत नसल्यास अशा वेळी सदर कारखान्यातील production शी संबंधित तज्ञ कर्मचाऱ्यांचे सहकार्य घेऊन आपल्या ASI Software च्या ( Block H , I व J ) मधील item ची नावे या कर्मचाऱ्याला दाखवावी व कारखानदाराने दिलेल्या नावा ऐवजी पर्यायी नावे शोधून आपले ASI Return पूर्ण करावे.

प्रश्न क्र.३१ काही कंपन्यांमध्ये Raw Material किंवा Product ची संख्या 10 पेक्षा जास्त असते, ती संख्या 10 पर्यंत कशी मर्यादित करावी ? उर्वरित Raw Material किंव्हा Product हे जर Other Product मध्ये समाविष्ट केल्यास त्याची टक्केवारी बऱ्याच वेळा 10 पेक्षा जास्त होते , अश्यावेळी काय करावे ?

उत्तर : ASI Software मध्ये Raw Material किंवा Product ची संख्या 10 पेक्षा जास्त असल्यास ज्या Raw Material किंव्हा Product ची Value जास्त आहे त्या Raw Material किंवा Product ची नोंद करून उर्वरित रक्कम

other raw material consumption, other product / by product म्हणून ती रक्कम नोंदवण्यात यावी . किंवा Similar Category चे Raw Material किंवा Product एकत्रित करून त्यांची संख्या 10 पर्यंत ठेवावी व उर्वरित Raw Material किंवा Product Value other basic items मध्ये ( BLOCK H ,I , J ) मध्ये नमूद करावी.

प्रश्न क्र.३२ Profit Before Tax घेतल्यानंतर current tax किंव्हा differed tax ची entry कोठे करायची ?

उत्तर : Balance Sheet च्या Profit & Loss मध्ये profit before tax नंतर जर current taxes च्या valueची नोंद केली असल्यास GST ( Block J 12 ) , Service Tax ( F 3 ) मध्ये नमूद करावा , Profit Before Tax नंतर येणारे Income Tax , differed tax विचारात घेऊ नये .

प्रश्न क्र.३३ पेट्रोल / डिझेल चे BIFURCATION दिलेले नसते ?

उत्तर : Profit & Loss account च्या Car expenses मध्ये car petrol/diesel exp, car repair & maintenance exp, car insurance exp, car parking charges या Value include असतात अश्या वेळेस सदर कारखान्यातील accountant dept. मधील कर्मचाऱ्याकडून car expenses चे bifurcation घेऊन प्रत्येक item ची value सदर ब्लॉक मध्ये नमूद करणे आवश्यक आहे . पेट्रोल /डिझेल ( Block H, १७ ) , car repair & maintenance ( Block F २ ( ii)), car insurance ( Block F ५ ), car parking charges Block F ३.

प्रश्न क्र.३४ माहिती नोंदणी केल्या नंतर data tally करताना check points काय आहेत ?

उत्तर : ASI survey साठी निवड झालेल्या कारखान्याच्या Balance sheet मधील माहिती ASI Software मध्ये भरल्यानंतर खालील check point तपासणे आवश्यक आहे .

( १) कारखान्याचे status code १ ते ८ असल्यास Block A, item ५ मध्ये ५ digits Nic Code नोंदविणे आवश्यक आहे व जर सदर कारखान्याचे status code १ असल्यास ( Block H, I, J ) मध्ये दर्शवलेले raw material , finished product Block A, item ५ च्या ५ digits Nic Code नुसार असणे आवश्यक आहे.

( २ ) कारखान्याचे Status Code १ असल्यास ASI Return मधील सर्व block भरणे आवश्यक आहे . Status Code २ असल्यास ( block A,B,C,D,E,K,L,M,N ) व Balance Sheet मध्ये असलेल्या इतर items च्या अनुषंगाने माहिती भरणे आवश्यक आहे. तसेच Status Code ३ असल्यास ( block A,B,C,D,K,L,M,N ) व Balance Sheet मध्ये असलेल्या इतर items च्या अनुषंगाने माहिती भरणे आवश्यक आहे.

( ३ ) Block B, item no. २ मध्ये Type of organization ( code ७ ) असल्यास ( Block B, item no. ३.) मध्ये २१ Digits CIN Number नोंदवणे आवश्यक आहे.

( ४ ) ज्या कारखान्यांमध्ये Research & Development (R&D) unit आहे या कारखान्यांचे ASI Return भरताना ( Block B, item ९ ) मध्ये १ किंवा २ code number नोंदविला असल्यास , block F, item ७ मध्ये Value नोंदवणे आवश्यक आहे.

( ५ ) Fixed assets ( Block C , item २, Col. २ ते १३ ) मध्ये Building ची Value दर्शवली नसल्यास , Rent paid for building ( Block F, item ८ , Col . ३ ) मध्ये नोंद करावी.

( ६ ) Fixed assets ( Block C , item ३ ते ७, Col. २ ते १३ ) मध्ये जर कोणत्याही एखाद्या item ची Value दर्शवली नसल्यास , Rent paid for plant & machinery and other fixed item ( Block F, item ६ , Col . ३ ) मध्ये नोंद करावी.

( ७ ) Fixed assets ( Block C , item ४ , Col. २ ते १३ ) मध्ये transport ची Value दर्शवली असल्यास त्या अनुषंगाने निगडीत असलेल्या संबंधित Item मध्ये नोंद आवश्यक आहे .उदा . Repair vehicle ( block F २ (ii), Col . ३ ), car insurance (Block F, item ५ , Col . ३ ), petrol ( Block H, item १७, Col. ६)

( ८ ) निर्धारित केलेल्या नियमानुसार fixed assets च्या depreciation value पेक्षा जास्त depreciation value ASI Survey साठी निवड झालेल्या कंपनी च्या balance sheet मध्ये दर्शविले असल्यास ( block N ) मध्ये depreciation value as per balance sheet असा remark द्यावा .

( ९ ) कारखान्याने दिलेल्या balance sheet मध्ये balance sheet च्या assets मध्ये stock of inventory ची value दिली जाती , या value मध्ये raw material, packaging material , trading material, lubricant oil, store and spares , semi finished goods , finished goods या item च्या value तसेच profit & loss account मधील material purchase, variation stock of semi finished goods व finished goods यांचे value चे bifurcation असणे आवश्यक आहे, कारण या value मध्ये raw material, packaging material , trading material, lubricant oil , store and spares , semi finished goods , finished goods या item च्या value समाविष्ट असते. या items चे bifurcation balance sheet मध्ये नसल्यास कारखान्यातील account संबंधित कर्मचाऱ्यांकडून या items चे bifurcation घेणे आवश्यक आहे कारण या bifurcation चा उपयोग raw material consumption ( indigenous) (block H , item १ ते ११), raw material consumption ( import ) ( block I , item १ ते ६), packaging material consumption ( block H , Sr. no. १४ , Col. ६), trading material consumption (block F , Sr. no. ११ , Col. ३), petrol , lubricant oil consumption ( block H , Sr. no. १७ , Col. ६ ), spare and store consumption ( block H , Sr. no. २१ , Col. ६ ), semi finished goods ( block G , Sr. no. ७ , Col. ३ ), finished goods ( Net block tally, Receipt , col . ३ ). ASI Return मधील block भरण्यासाठी होतो .

( १० ) balance sheet मध्ये दर्शविलेले secured loan, unsecured loan, cash credit , demand loan व other loan हे कर्ज एका वर्षाच्या आत असल्यास त्यांची नोंद ( block D, Sr. १३ ) व जे loan एका वर्षा पेक्षा जास्त कालावधीसाठी असल्यास त्यांची नोंद ( block D, Sr. १७ ) मध्ये करण्यात यावी. या बाबतची नोंद योग्य त्या block मध्ये करणे आवश्यक आहे कारण long term loan ची entry जर ( block D, Sr. १३ ) मध्ये केल्यास त्यामुळे working capital ( block D, Sr. No. १६ ) negative ( - ) येवू शकते .

( ११ ) जर कर्जाची नोंद ( Block D, Sr. १३ व १७ , Col . ३ व ४ ) मध्ये असल्यास त्या कर्जावरील व्याजाची नोंद ( Block F, Sr. १० , Col . ३ मध्ये ) असणे आवश्यक आहे.

( १२ ) कारखान्यातील कर्मचाऱ्यांचे number of mandays paid ( Block E, Sr. १ ते ९, Col .७ ) हे number of present days ( Block E, Sr. १ ते ९, Col . ३,४,५ ) इतका किंवा जास्त असावे परंतु कमी नसावे .

( १३ ) Bonus, Ex-gratia, Pf and other fund ( Block E, item १०,११,१२ ) मधील प्रत्येक item ची value Gross salary and wages ( Block E, item Col.९ ) च्या २०% पेक्षा जास्त असल्यास Block N मध्ये remark द्यावा .

( १४ ) Profit & Loss account मधील Transport inward ( Block F, Sr. ३ & १२ ) व Transport outward ( Block F, Sr. १३ & Block J - १२ ) यांची value दोन वेळा नोंदविण्यात यावी .

( १५ ) एखादा कारखाना स्वतः Electricity निर्माण करत असल्यास याची नोंद (Block H, item १५, Col.६) मध्ये घेण्यात यावी . जर सदर करखान्याने manufacturing केलेली Electricity दुसऱ्या कारखान्याला विकत दिली असल्यास याची नोंद ( Block G, item ३, Col. ३ ) मध्ये घेण्यात यावी .

( १६ ) एखादा कारखाना वस्तु उत्पादन करण्याबरोबरच Trading activity करत असल्यास त्या कारखान्याच्या Trading साठी खरेदी केलेल्या वस्तूंची नोंद या सूत्राप्रमाणे ( op stock of trading material + purchases of trading material - closing stock of trading material = trading material consumption, Block F, Sr . ११, Col. ३ ) मध्ये करण्यात यावी. व त्या खरेदी केलेल्या वस्तूंवर कोणतीही प्रकिया न करता, आहे त्या condition मध्ये विकली असता याची नोंद (Block G , Sr . ११, Col. ३ ) मध्ये करण्यात यावी व Net Balance of Goods Sold in the same condition as purchased ची नोंद (Block G , Sr . ५, Col. ३) मध्ये करण्यात यावी .

( १७ )  जर कारखाना तोटयात चालत असेल, कामगारांच्या पगारावर जास्तीचा खर्च होत असेल , तसेच कारखान्यात विकलांग व्यक्ती काम करीत असतील, प्रदुषणा संबंधी काही मशिनरी स्थापीत करावयाची असेल तसेच कामगारांच्या प्रशिक्षणावर खर्च करत असेल व other non product subsidies, if any यांच्या नोंदी Block G, item १२, Col. ३ मध्ये घेण्यात यावी. यांची value (Block G, item १२, Col. ३) मध्ये नोंद झालेली दिसून येते परंतु ही Value Tally Profit Reconciliation च्या Income side मध्ये include झालेले दिसून येत नाही त्यामुळे net profit tally होत नाही याबाबत remarks (Block N) मध्ये देण्यात यावा . तसेच वस्तू उत्पादन करण्यासाठी मिळणारी Subsidy ही block J-१२ मध्ये नोंदविण्यात यावी . याची value (block J-१२ ) मध्ये दिसून येत नाही परंतु ही value Tally Profit Reconciliation च्या Income side मध्ये include झालेले दिसून येत.

( १८)  Raw material consumption ( INDIGENOUS ) ( Block H , Sr. १ ते १२ , Col. १ ते ७ ) या block मधील raw material ची नावे , NPC-MS items code, Unit of quantity, Quantity consumed, Purchase value, Rate per unit यांची माहिती ASI software मध्ये देण्यात आलेल्या instruction नुसार अचूक व पूर्ण भरण्यात यावी . सदर माहिती भरल्यानंतर Report मध्ये जाऊन आपण नोंद केलेली raw material consumption , manufacturing & sales of finish goods यांची unit of quantity व value ASI software मधील unit of quantity व value नुसार असल्याची खात्री करावी . ( प्र. क्र. २८ व २९ पहावे )

( १९ )  Other basic raw material ( INDIGENOUS ) ( Block H , item ११ , Col. ६ ) ची value raw material consumption ( Block H , item १२ , Col. ६ ) value च्या १०% पेक्षा जास्त नसावी .

( २० )  Raw material consumption ( IMPORT )  ( Block I , Sr. १ ते ७ , Col. १ ते ७ )  या block मधील raw material ची नावे , NPC MS items code, Unit of quantity, Quantity consumed, Purchase value, Rate per unit यांची माहिती ASI software मध्ये देण्यात आलेल्या instruction नुसार अचूक व पूर्ण भरण्यात यावी . सदर माहिती भरल्यानंतर Report मध्ये जाऊन आपण नोंद केलेली raw material consumption , manufacturing & sales of finish goods यांची unit of quantity व value ASI software मधील unit of quantity व value नुसार असल्याची खात्री करावी . ( प्र. क्र. २८ व २९ पहावे )

( २१ )  Other basic raw material ( IMPORT ) ( Block I, item ६ , Col. ६ ) ची value raw material consumption ( Block I , item ७ , Col. ६ ) value च्या १०% पेक्षा जास्त नसावी .

( २२ )  सदर Block J, Sr . १ ते १२, Col . १ ते १३ मध्ये description of product name, npc-ms items code, units of quantity, quantity manufactured , quantity sold , gross sales value , taxes , other distributive expenses , per unit sale value , ex factory value of quantity manufactured. यांची माहिती ASI software मध्ये देण्यात आलेल्या instruction नुसार अचूक व पूर्ण भरण्यात यावी . ज्या वेळेस opening & closing stock of finished goods (block D ६, col. ३ व ४ ) ची value निरंक असते त्यावेळी (block J, col. ५) manufacturing quantity व (block J , col. ६) sales quantity ची नोंद सारखीच आली पाहिजे.

( २३ )  Other product / by product ( Block J, item ११, Col. ७ ) ची value gross sale ( Block J, item १२ , Col. ७ ) value च्या १०% पेक्षा जास्त नसावी .

( २४ )  Quantity manufactured of product ( Block J, Sr. १ ते १० , Col . ५), Quantity sale of product (Block J, Sr. १ ते १० , Col . ६ ) याचा संबंध opening stock of finished goods ( Block D, Sr. ६, Col . ३) व closing stock of finished goods ( Block D, Sr. ६, Col . ४ ) यांच्याशी आहे . जर opening stock of finished goods ( Block D, Sr. ६, Col . ३ ) व closing stock of finished goods ( Block D, Sr. ६, Col . ४) यांची value निरंक असल्यास Quantity manufactured of product ( Block J, Sr. १ ते १०, Col . ५), Quantity sale of product ( Block J, Sr. १ ते १० , Col . ६ ) यांची value सारखीच असणे आवश्यक आहे . अन्यथा कारखान्याने दिलेल्या माहितीची शहानिशा करून ( Block J, Sr. १ ते १० , Col . ५ & ६ ) मध्ये अचूक नोंद करावी .